# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/2010/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १६ ◆ अंक ३८ ◆ अमरावती ◆ गुरूवार, दि. २२ ते २८ जानेवारी २०२६ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com


## ज्ञान, तंत्रज्ञान, विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठी दावोस दौरा : मुख्यमंत्री



दावोस :- स्वित्झर्लंडमध्ये वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळविण्यासाठीचा महत्वाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. दुसऱ्या दिवशी तिसऱ्या मुंबईतील पहिले शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली.

आज प्रामुख्याने धोरणात्मक असे सामंजस्य करार करण्यात आले. ज्यामध्ये युनिव्हर्सिटी ऑफ कॅलीफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह -लंडन, आयसीसीआय-इटली, अँलाँग ट्युनिंग इन्स्टिटयूट, नॉर्वेजीयन जीओ टेक्निकल इन्स्टिट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना जुराँग सिंगापूर यांच्यासोबत टेक्निकल सामंजस्य करार केले आहेत. यातून एक प्रकारे केवळ गुंतवणूक नाही, तर ज्ञान आणि तंत्रज्ञानातून मोठ्या प्रमाणात उद्योग आणता येतील, वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्यारितीने काम करता येईल. अर्बन प्लॅनिंग, ट्रान्सपोर्टशी संबंधित करारांमुळे प्रत्येक शहरातील वाहतूक सुविधांची सरंचना चांगल्या रितीने करता येणार आहे.

दावोस दौऱ्यातून नॉलेज-ज्ञान, टेक्नॉलॉजी-तंत्रज्ञान आणि एफडीआय-विदेशी गुंतवणूक मिळविता येते. त्याचा देशाला आणि पर्यायाने राज्याला मोठा फायदा होतो. यंदा नागरी क्षेत्रातील नियोजन आणि परिवहन व्यवस्थेच्या दृष्टीने या क्षेत्रातील दिग्गज कंपन्याशी संवाद, समन्वय साधता आल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्यासाठी मेडटेक सहकार्य

राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सुविधा पोहचविण्याचा प्रय़त्न आहे. त्यादृष्टीने यंदा दावोसमध्ये मेडीकल-टेक्नॉलॉजीबाबत एका सत्रात चांगली आणि सकारात्मक चर्चा केल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. यातून राज्यातील आरोग्य सुविधांसाठीचा रोडमॅप निश्चित करण्यात आला. यातून आपल्याला राज्यात मेड-टेक स्टार्टअपची चांगली इकोसिस्टिम निर्माण करण्याचा प्रय़त्न. त्यासाठी जगातील अशी सुविधा उभ्या करणाऱ्या सर्वोत्तम कंपनीशी करार करण्यात आला आहे.

नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. त्याबाबत दावोसमध्ये घोषणा करण्यात आली. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळविण्यात येत होत्या. त्या मिळाल्यानंतर आज या तिसऱ्या मुंबईतील पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

याठिकाणी प्लग अँण्ड प्ले या धर्तीवर रेडी टू स्टार्ट पद्धतीने संबंधित घटक लगेच कामकाज सुरु करु शकणार आहेत. ही देशातील पहिली कंपनी, यामध्ये खासगी-सार्वजनिक भागीदारी (पीपीपी) प्रकल्प असणार आहे. यात शासन, एमएमआरडीए आणि खासगी घटक एकत्र येऊन काम करतील. याठिकाणी नवीन बिझनेस डीस्ट्रिक्ट तयार करण्यात येत आहे.

## खिचडीच्या वादातून मजुराची हत्या, आरोपीला अटक

अचलपूर : खिचडीवरून उद्भवलेल्या वादातूनथ्रेशर मशीनवर काम करणाऱ्या एका मजुराची काठीने हल्ला चढवून हत्या करण्यात आली. ही घटना मंगळवार, २० जानेवारी रोजी रात्री परतवाडा ठाण्याच्या हद्दीतील अष्टमासिद्धी परिसरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.बिरू शिवकली मरसकोल्हे (४५) रा. काजलडोह, चिखलदरा असे मृतक तर भोंटू उर्फ भोंदू ब्रिजलाल कवडेकर (३१) रा. काजलडोह, चिखलदरा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. बिरू व भोंटू हे दोघेही अचलपूर येथील प्रभाकर वानखडे यांच्या थ्रेशर मशीनवर मजूर म्हणून कामाला होते. मंगळवारी ते दोघे तूर काढण्यासाठी थ्रेशर मशीन घेऊन अष्टमासिद्धी परिसरातील एका शेतामध्ये गेले होते. दिवसभर काम - करून रात्री भोंटूने जेवणासाठी चुलीवर खिचडी शिजवली. जेवणापूर्वी त्यांनी सोबत मद्य प्राशन केले. दरम्यान, मद्य प्राशनानंतर तू खिचडी चांगली बनवली नाही, असे - म्हणत बिरूने भोंटूशी वाद घातला. या वादात बिरूने - खिचडीची प्लेट भोंटूच्या अंगावर फेकली. त्यामुळे भोंटूने रागाच्या भरात बिरूवर काठीने हल्ला चढविला. त्यामध्ये बिरूचा जागीच मृत्यू झाला. सदर घटनेनंतर भोंटू हा - रात्रभर तेथेच झोपला. बुधवारी सकाळी त्याने बिरूचा मृत्यू झाला असून तो शेतात पडून असल्याची माहिती थ्रेशर मालक प्रभाकर वानखडे यांना दिली. त्यानुसार प्रभाकर वानखडे यांनी भोंदूसोबत सदर शेत गाठून पाहणी केली. त्यानंतर त्यांनी घटनेची माहिती परतवाडा पोलिसांना दिली. माहिती मिळताच ठाणेदार सुरेश म्हस्के = यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेहाला शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी भोंटूची कसून चौकशी केली. चौकशीत खिचडीवरून उद्भवलेल्या वादात आपण बिरूची हत्या केल्याची कबुली भोंटूने पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी भोंटूविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

## 'लाँगमार्चची युगयात्रा' ग्रंथाचे २४ जानेवारीला बडनेऱ्यात प्रकाशन

अमरावती: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाच्या ऐतिहासिक संघर्षाचे सखोल दस्तऐवजीकरण करणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आंदोलन : एक क्रांतीपर्व हा ग्रंथ प्रा. प्रकाश विश्वनाथ बोरकर यांनी लिहिला असून, गौरव प्रकाशन अमरावती यांनी तो प्रकाशित केला आहे.




या ग्रंथाचा भव्य प्रकाशन सोहळा शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता बडनेरा येथील सार्वजनिक कपिल मंडळ सभागृह, अशोक नगर, नवी वस्ती* येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्यमान इ. मो. नारनवरे (सुप्रसिद्ध साहित्यिक, नागपूर) राहणार असून, ग्रंथाचे प्रकाशन आयुष्यमान ताराचंद्र खांडेकर* (फुलेआंबेडकर चळवळीचे भाष्यकार) यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आयुष्यमान विजयकुमार चौरपगार (राज्य संघटक, भारतीय बौद्ध महासभा, महाराष्ट्र राज्य), प्रा. डॉ. रवींद्र मुंद्रे (सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) तसेच आयुष्यमान दिलीपभाऊ एडतकर (संपादक, दैनिक विदर्भ मतदार, अमरावती) उपस्थित राहणार आहेत.

विशेष अतिथी म्हणून आयुष्यमान इंजि. विवेक जनार्दन मवाडे (नांदेड, मराठवाडा), आयुष्यमान कृष्णाजी बोरकर (नागपूर) आणि आयुष्यमती चंदाताई दामू इंगळे-तायडे (मुंबई) यांची उपस्थिती लाभणार आहे.

या ग्रंथप्रकाशन कार्यक्रमाचे आयोजन सार्वजनिक सिद्धार्थ वाचनालय, बडनेरा यांच्या वतीने करण्यात आले असून, आयुष्यमान व्ही. एस. मेश्राम (सचिव) व आयुष्यमती पुष्पा बोरकर* (कोषाध्यक्ष) यांच्यासह सर्व कार्यकारी संचालक, बडनेरा हे संयोजन पाहत आहेत.मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनातील ऐतिहासिक लाँगमार्च, त्यामागील सामाजिक व सांस्कृतिक भूमिका, बहुजन चळवळीचा संघर्ष आणि त्याचे दूरगामी परिणाम यांचा अभ्यासपूर्ण वेध घेणारा हा ग्रंथ संशोधक, विद्यार्थी, अभ्यासक व सामाजिक कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. या ऐतिहासिक ग्रंथप्रकाशन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.







काय करूं आतां धरूनिया भीड । निःशंक हे तोंड वाजविले ॥
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ॥

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## महापालिका निवडणूकीत कॉँग्रेसचे वस्त्रहरण

*महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर अमरावती शहरातील सोशल इंजिनियरिंगची समिकरणे पूर्णपणे बदलल्याचे दिसून येत आहे. मुस्लीम आणि दलित मतदारांमध्ये उभी फूट पडल्यामुळे कॉँग्रेसचे येथे वस्त्रहरण झाल्याचे चित्र आहे. महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर, राजकीय स्थितीमध्ये बराच बदल झाल्याचे दिसले. २०१७ मधील १५ जागांवरच कॉँग्रेस आजही कायम आहे. २०१७ च्या तुलनेत कॉँग्रेसने आपल्याजागा कायम राखल्या असल्या तरी, राष्टलीय स्तरावर कॉँग्रेसची जी अवस्था आहे, तिच येथेही कायम असल्याचे दिसून येते. कॉँग्रेसचे स्थानिक नेते कितिही आपली आरती ओवाळून घेत असले तरी, त्यांनी सन २०१७ चीच स्थिती आजही कायम ठेवली ही वस्तुस्थिती आहे. या निवडणुकीत युवा स्वाभिमान पार्टी कॉँग्रेसच्या तुल्यबळात उभी असल्याचे चित्र दिसले. ही स्थिती कॉँग्रेसच्या सोशल इंजिनिअरिंगमध्ये सुरुंग लावत असल्याचे संकेत आहेत. १९९२ मध्ये झालेल्या अमरावतीच्या पहिल्या मनपा निवडणुकीत कॉँग्रेसचा सुवर्णकाळ होता. त्यावेळी कॉँग्रेसने २७ जागांवर विजय मिळवून सर्वात मोठ्या पक्षाचा बहुमान मिळवला होता. डॉ देविसिंह शेखावत कॉँग्रेसच्या तिकिटावर जिंकून पहिले महापौर बनले. सोबतच रिपाइं (गवई गट) ने एक जागा आणि जनता दलानेही एक जागा जिंकली होती. लहान गटांचा विजय हे दर्शवतो, त्या वेळच्या राजकारणात मुद्दे प्रभावी होते. यावेळी महापालिकामध्ये ७८ सदस्यी एकल वार्ड पध्दतीने निवडणुका झाल्या. याआधी सुमारे ९ वर्ष पर्यंत प्रशासक राज चालत होते. सन १९९२ मध्ये कॉँग्रेसने जी सोशल इंजिनिअरिंग केली होती, त्याला यावेळी मनपा निवडणूकीत सुरुंग लागला आहे. याला उत्तर प्रदेशातील बदलल्या सोशल इंजिनिअरिंगप्रमाणे समजले जावू शकते. सन १९९२ मध्ये उत्तर प्रदेशात कॉँग्रेसला मागे टाक त मुलायमसिंह यादव मुस्लीमांचे नेते बनून पुढे आले होते. नंतर मायावतींनी दलित मतांवर पकड निर्माण केली. असाच प्रकार मनपा निवडणुकीत दिसून आला. कॉँग्रेसच्या मुस्लीम मतांवर एमआयएमने ताबा मिळवलाआहे. तर दलित मतांचे दावेदार म्हणून वंचित बहुजन आघाडी आणि बहुजन समाजवादी पार्टीकडे पाहिलेज जात आहे. आधी मुस्लीम मतांवर कॉँग्रेसचा ताबा होता, तर दलित मतांचे दावेदार दादारासाहेब गवई, जोगेंद्र कवाडे आणि रामदास आठवले यांच्याकडे पाहिले जायचे. दुसरीकडे कॉँग्रेसच्या हिंदू मतांवर भाजपने पकड निर्माण केली आहे. अशातच मनपा निवडणुकीत एमआयएम हे मुस्लीमांचे नवे तारणहार म्हणून पुढे आले आहेत. तर दलित मतांवर वंचित बहुजन आघाडी आणि बसपाने ताबा घेतला आहे. अशीच परिस्थिती राष्टलीय स्तरावरही आहे. अमरावतीच्या या बदलत्या राजकिय समिकरणांचा फायदा भाजपा आणि युवा स्वाभिमान पार्टीला होताना दिसत नाही. युवा स्वाभिमान पार्टीने दुसजया क्रमांकावर स्थान पटकावले आहे. मनपा निवडणुकीत मुस्लीम बहुल जागांमुळे कॉँग्रेसचा सफाया केला आहे.कॉँग्रेस केवळ एक मुस्लीम बहुल जागेवर आपला ताबा मिळवू शकले आहे. १९९२ पासून कॉँग्रेसचे पतन सुरु झाले होते. १९९७ मध्ये झालेल्या मनपा निवडणुकीत कॉँग्रेस १३ जागांवर पोहचली होती.या निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला, याकरिता तिकिट वितरणातील असंतोष जबाबदार मानला जाऊ शकतो. तर भाजपा नेत्या नवनित राणा या युवा स्वाभिमान पार्टीच्या विकासाकरिता जबाबदार असल्याचेही म्हटले जाते. तसेच शिवसेनेचे दोन गट आणि अजित पवारांचा राष्टलवादी पक्ष आपल्या मुळापासून दूर गेल्याने त्याचे परिणाम भोगतो आहे. मनपा निवडणुकीत आ संजय खोडकेंचे गणितही विस्कळीत झाले आहे. मात्र कॉँग्रेसची वोट बॅंक सरळ तिन तुकड्यात विभागली गेली असून, अमरावतीमध्ये सोशल इंजिनियरिंगचे हे नवे समिकरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. मुस्लीमांचे नेते म्हणून एमआयएमचे हाजी हरफान पठाण पुढे आले आहेत. तर विधानसभा निवडणुकीत मुस्लीम मत मिळवणारे अलिम पटेल मात्र मनपा निवडणूकीत गायब दिसले. ही बदलती समिकरणे अमरावतीच्या आगामी राजकारणावर काय परिणाम काय करतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.*

# ‘हिंद की चादर’ धर्मस्वातंत्र्य व मानवतेचा संदेश देणारा ऐतिहासिक उपक्रम





धर्म, सत्य आणि मानवतेसाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे नववे शीख गुरु श्री गुरु तेग बहादूर सिंह जी यांचे बलिदान भारतीय इतिहासात अजरामर आहे. हिंद की चादर म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर जी हे केवळ शीख समाजाचेच नव्हे, तर संपूर्ण भारतवर्षातील धर्मस्वातंत्र्याचे महान रक्षक होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि त्यांच्या विचारांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शीख समाज, सिंधी समाज, बंजारा समाज आणि लुबाणा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नेतृत्वाखाली अमरावती येथे भव्य हिंद की चादर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. २३ नोव्हेंबर रोजी अमरावतीतील राजकमल चौक येथे झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात श्लोक मेहला नववाच्या पठणाने झाली. त्यानंतर भावपूर्ण शबद कीर्तन सादर करण्यात आले. उपस्थित जनसमुदायाला गुरु तेग बहादूर जी यांच्या जीवनकार्याचा, त्यागाचा आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचा इतिहास सविस्तरपणे सांगण्यात आला.

गुरु तेग बहादूर जी धर्मस्वातंत्र्याचे महान रक्षक

गुरु तेग बहादूर सिंह जी (१६२११६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांनी जबरदस्तीने धर्मांतराच्या विरोधात उभे राहत काश्मिरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी आपले प्राण अर्पण केले. त्यांनी कोणत्याही एका धर्मासाठी नव्हे, तर सर्व धर्मांच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. दिल्लीतील चांदणी चौक येथे त्यांनी दिलेले बलिदान आजही मानवतेचा, सहिष्णुतेचा आणि धैर्याचा सर्वोच्च आदर्श मानले जाते.

अमरावती येथील या ऐतिहासिक कार्यक्रमाला खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, डीसीपी श्री गणेश शिंदे, (गुरुद्वारा गुरुसिंग सभाचे अध्यक्ष,) अमरजोत सिंग जग्गी, (गुरुद्वारा श्री गुरुसिंग सभाचे कार्यकारी अध्यक्ष,) रविद्रसिंग सलुजा, (मुख्य संपादक, प्रतिदिन अखबार) नानक आहुजा, (पूज्य पंचायत, कावर नगर) ॲड. वासुदेव नवलानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचा एक विशेष भाग म्हणून विशेषतः तयार करण्यात आलेल्या प्रचार वाहनाला जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आले. यावेळी संजिता महापात्रा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती, यांची उपस्थिती होती.

हिंद की चादर हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम नसून, तो समाजात ऐक्य, सहिष्णुता आणि इतिहासाबद्दलची जाणीव निर्माण करणारा व्यापक प्रयत्न आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या पुढाकाराचे विशेष कौतुक करावे लागेल. नागपूर येथे होणाऱ्या हिंद की चादर कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी विविध समन्वय बैठकांचे आयोजन करून प्रशासन व समाज यांच्यात उत्कृष्ट समन्वय साधला.

अमरावती येथे आयोजित हिंद की चादर कार्यक्रमाने गुरु तेग बहादूर जी यांच्या विचारांना नवसंजीवनी दिली. धर्मस्वातंत्र्य, मानवता आणि सत्यासाठी उभे राहण्याची प्रेरणा या कार्यक्रमातून जनतेला मिळाली. विविध समाजघटकांचा सहभाग आणि शासनाचे सक्रिय सहकार्य यामुळे हा उपक्रम एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी पर्व ठरला.

गुरु तेग बहादूर जी यांचा संदेश आजही तितकाच समर्पक आहे सर्व धर्मांचा सन्मान करा, अन्यायाविरुद्ध उभे रहा आणि मानवतेचे रक्षण करा.

**✻ लेखक: डॉ. निक्कू खालसा**
**सचिव, गुरुद्वारा श्री गुरुसिंग सभा, अमरावती**
**✻ संकलन- जिल्हा माहिती अधिकारी अमरावती.**
**जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती.**

# यवतमाळ येथे नवीन श्री सत्य साई संजीवनी माता व बाल रुग्णालयाच्या उभारणीसाठी भूमिपूजन संपन्न







यवतमाळ दि. २१ : अर्नी रोडवरील किन्ही गावाजवळ नवीन श्री सत्य साई संजीवनी माता व बाल रुग्णालयाच्या उभारणीसाठी भूमिपूजन सोहळा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या शुभप्रसंगी सुप्रसिद्ध क्रिकेटपटू श्री सुनील गावस्कर जी आणि बेंगळुरू येथील श्री सत्य साई हेल्थ अँड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष श्री सी. श्रीनिवास जी यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे आयुष्मान भारत प्रमुख श्री ओमप्रकाश शेटे जी, एचडीएफसी एएमसी इंडिया चे एचआर प्रमुख श्री आलोक शिओपूरकर जी, सीईओ (आयएएस) श्री मंदर पाटकी जी, एडीटीपी श्री सर्वेश चाफले जी, मुंबई येथील ट्रस्ट अधिकारी श्री ओंकार जोशी जी, श्री प्रकाश नांदूरकर जी, श्री अजय मुंद्रा जी, कंत्राटदार श्री अरुण शास्त्रकार जी, श्री किशन बजाज, श्री विरेंद्र अग्रवाल, किन्ही गावचे सरपंच, डॉ. शीतल तसेच अनेक प्रतिष्ठित पाहुणे उपस्थित होते. यवतमाळ येथील श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयाचे प्रभारी श्री पंकज गुप्ता यांनी सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत केले. स्वागताचा सर्वात भावनिक क्षण म्हणजे जुन्या संजीवनी रुग्णालयात जन्मलेल्या पहिल्या, दुसऱ्या व जुळ्या बालकांनी तसेच परिचारिकांच्या मुलांनी मान्यवरांचे स्वागत केले, ज्यामुळे संस्थेच्या सेवाभावाचे जिवंत प्रतीक समोर आले. आपल्या भाषणात श्री पंकज गुप्ता यांनी श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयांची स्थापना व कार्यपद्धती सांगितली. ही रुग्णालये पूर्णतः मोफत सेवा देतात आणि येथे कोणताही बिल काउंटर नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. यवतमाळ टीमला स्वतःची कायमस्वरूपी इमारत उभारण्यासाठी जमीन मिळाल्याबद्दल त्यांनी ईश्वराचे आभार मानले. देशातील पाच माता व बाल रुग्णालयांमध्ये आतापर्यंत ११,५०० हून अधिक प्रसूती झाल्या असून, त्यापैकी १,६६० प्रसूती यवतमाळ केंद्रात झाल्याचे त्यांनी सांगितले. श्री सुनील गावस्कर जी यांनी ‘सेवा’ या भावनेवर आपले मनोगत व्यक्त करत आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील सुरुवातीचे अनुभव सांगितले. सीईओ श्री मंदर पाटकी जी यांनी मुंबईतील श्री सत्य साई रुग्णालयाशी संबंधित वैयक्तिक अनुभव शेअर केले.

आयुष्मान भारतचे प्रमुख श्री ओमप्रकाश शेटे जी यांनी रुग्णालयाच्या कार्याचे कौतुक करत मुंबई येथे हृदय प्रत्यारोपण सेवा सुरू करण्याची विनंती अध्यक्षांकडे केली. एचडीएफसी एएमसी इंडिया चे एचआर प्रमुख श्री आलोक शिओपूरकर जी यांनी सांगितले की एचडीएफसी केवळ संपत्ती निर्माण करणारी संस्था नसून समाज आणि राष्ट्रसेवेसाठी सर्वतोपरी योगदान देणारी संस्था आहे. ते म्हणाले की एचडीएफसी सदैव राष्ट्रसेवेसाठी सज्ज आहे. अध्यक्ष श्री सी. श्रीनिवास जी यांनी संजीवनी रुग्णालयांची संकल्पना स्पष्ट केली आणि आतापर्यंत ४०,००० हून अधिक हृदय शस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात आल्याचे सांगितले. जिथे कोणी पोहोचू शकत नाही, तिथे आमची टीम पोहोचते, असे सांगत त्यांनी वंचितांपर्यंत सेवा पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. भूमिपूजनानंतर श्री सुनील गावस्कर जी आणि इतर मान्यवरांनी वाघापूर येथील कार्यरत श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयाला भेट दिली. कर्मचाऱ्यांच्या मुलांनी त्यांचे प्रेमपूर्वक स्वागत केले. मान्यवरांनी रुग्णालयाची पाहणी करताना मागील दोन दिवसांत जन्मलेल्या बालकांना गिफ्ट ऑफ लाईफ प्रमाणपत्रे व नवजात किट्स प्रदान केले. तसेच वीर, अभय, श्रेयस आणि देवेंद्र या उपग्रह प्रकल्पावर

साधला.

## राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहांतर्गत जनजागृती रॅली

अमरावती : श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय येथे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत जनजागृती रॅली काढण्यात आली.

महाविद्यालय परिसरापासून ते उत्तमनगर, यशोदानगर या मुख्य रस्त्याने रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी नागरिकांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले. ट्रिपल सीट वाहन चालवू नये, मद्यपान करून वाहन चालवू नये, ओव्हरस्पीड वाहन चालवू नये, चुकीच्या पद्धतीनेवाहन ओव्हरटेक करू नये, वाहन चालवताना हेल्मेटचा नेहमी वापर करावा, आदी नियम वाहन चालकांना व नागरिकांना समजावून सांगण्यात आले. रॅलीद्वारे नागरिकांना रस्ता सुरक्षेचे नियम आणि त्यांचे महत्त्व पटवून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. रॅलीचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश म्हस्के आणि महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. दिपाली पडोळे यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ. शुद्धोधन कांबळे, प्रा. जी. एच. पांडे, प्रा. डॉ. प्रशांत खेडकर, प्रा. डॉ. सुनील कुमार, प्रा. डॉ. प्रदीप अंबोरे, प्रा. डॉ. राजेश देशमुख, प्रा. डॉ. सुधीर सांगोले, प्रा. हेमंत सावळे, प्रा. महेश बनसोड, प्रा. एन. डी. अढाऊ, प्रा. ज्योती टाले, प्रा. दिपाली गवई, प्रा. राधा काळे, प्रा. मेघा चिमणकर, राजेश नाखले, किशोर बिजवे आदी उपस्थित होते.

# गौणखनीज व्यावसायीकाच्या हत्येप्रकरणी मास्टर माईंड व रेकी करणाऱ्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले

चांदूरबाजार दि. २१ : गौण खनीज व्यावसायिक निलेश बदुकले यांची सोमवारी गाडीची धडक देऊन हत्या करण्यात आली होती.त्यात वाहन चालक अजय लंगोटे याला पोलीसांनी त्याच दिवशी वाहनासह ताब्यात घेतले.त्याला २२ जाने.पर्यत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.त्यांनंतर ठाणेदार अशोक जाधव यांना या हत्याकांडात आणखी दोघे असल्याची माहीती मिळाली.त्यांनी याची माहीती वरीष्ठांना दिल्यानंतर चांदूरबाजार पोलीस व गुन्हे अन्वेक्षण विभाग अमरावती यांनी संयुक्त कारवाई करुन या हत्याकांडाचा मास्टर माईंड गोलु उर्फ संजय लंगोटे व रेकी कणारा पवन झटाले सिरजगाव बंड यांना ताब्यात घेतले. चांदूरबाजार



तालुक्यातील ब्राम्हणवाडा थडी येथील रहिवाशी हल्ली मुक्काम टोम्पे नगर गोपाल नगर चांदूरबाजार येथील रहिवाशी निलेश सुरेश बदुकले वय ४२ हे पत्नी सरीतासह चांदूरबाजार वरून वलगाव रोडने मॉर्निंग वॉक वरुन परत येत असता मागून वाहन घेऊन येणार्या वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली होती. गंभीर जखमी केले.यात निलेशच्या डोक्याला जबर मार लागला तर पत्नी सरीता जखमी झाली.त्यात निलेशचा मृत्यु झाला. मृतकाचे वडील सुरेश हिम्मतराव बदुकले यांच्या तक्रारीवरुन चांदूरबाजार पोलीसात दिलेल्या तक्रारीवरुन पोलीसांनी वाहन चालक अजय लंगोटे याला ताब्यात घेऊन आरोपी विरुध्द कलम १०३ (१),२८१,१२५ (अ) भान्याससह कलम १८७ मोवाका नुसार गुन्हा दाखल केला. मुरूम व्यवसायाच्या वादातून निलेश बदुकले व्यावसायिकाची चारचाकी वाहनाने धडक देऊन हत्या करणाऱ्या आरोपी अजय भुजंगराव लंगोटे वय ४२ याला चांदूर बाजार पोलिसांनी २० जानेवारी रोजी न्यायालयात हजर केले होते.आरोपीला दोन दिवसाची पोलीस कोठडी मिळाली. या दरम्यान चांदुर बाजारचे ठाणेदार अशोक जाधव यांना माहिती मिळाली होती की या हत्याकांड प्रकरणात आणखी दोन आरोपी आहे.चांदुर बाजारचे ठाणेदार अशोक जाधव व सहाय्यक ठाणेदार उल्लास राठोड व एलसीबी पथक यांनी गोलु उर्फ संजय भुजंगराव लंगोटे वय ४० रा.थुगांव पिंपरी आणि आरोपी पवन विकास झटाले वय २३ रा.शिरजगांव बंड यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली. हत्याकांड करण्याच्या एक आरोपीने एक दिवसापुर्वी पासुन पवन ने रेकी करून गोलुला माहिती दिल्याची कबुली दिली.व गोलूने अजयला वाहन पाठविण्याची माहीती मिळाली.यावरुन चांदूरबाजार पोलीस व गुन्हे अन्वेक्षण विभागाने संयुक्त कारवाई करुन दोघांनाही अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर करण्यात आले.पुढील तपास ग्रामीण पोलिस अधिक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनात चांदुर बाजारचे ठाणेदार अशोक जाधव व सहाय्यक ठाणेदार उल्लास राठोड कारवाई करीत आहे.

# शुक्रवारी बहिरम येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची कापूस परिषद

अमरावती : येत्या २४ तारखेला बहिरम येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची कापूस परिषद आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मंथन केले जाणार आहे.

वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड अशी ओळख असणाऱ्या वऱ्हाड अर्थात विदर्भातील कापूस उत्पादकांचे प्रश्न अधिक गंभीर झाले आहेत. या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी येत्या २४ तारखेला बहिरम येथे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची कापूस परिषद आयोजत करण्यात आली असल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. १९७० साली महाराष्ट्र शासनाने कापुस एकाधिकार योजना सुरू केली होती. यात शेतकरी वर्गाचा फायदा होण्याऐवजी शेतकरी अधिक तुटला, आणि संघर्षाची ठिणगी पडली.

दादासाहेब हावरे, भाऊ साबळे, शंकरराव बोबडे, केशरबाई सिकची,मामराज खंडेलवाल या सर्व लोकांनी शेतकरी आंदोलन सुरू केले.पोलिस प्रशासनाने हे आंदोलन दडपण्यासाठी सर्वच प्रकारे प्रयत्न केले. रामापुरचे शेतकरी विठ्ठलराव दुतोंडे पोलिसांच्या अमानुष गोळीबारात शहीद झाले.

शेतकरी मरणासन्न अवस्थेत असतांना आंदोलक जिवाची पर्वा न करता शासनाला प्रश्न विचारत होते. हा दिवस होता २४ जानेवारी १९७५ आणि स्थळ बहिरम होते. या आंदोलनाची आठवण म्हणुन शेतकरी कार्यकर्ता प्रकाश साबळे, सुधाकर दादा हावरे, विदर्भकुमार बोबडे, रवि खंडेलवाल, निलेश दोतोंडे, गोपाल भालेराव ही मंडळी शहीद झालेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ५२ वा स्मृतिदिन बहीरम येथे २४ जानेवारी रोजी साजरा करणार आहे.


# ग्रामपंचायत कार्यालय सार्सी

## पंचायत समिती नांदगाव खं.,जि. अमरावती

### -निविदा सुचना-

सरपंच सचिव ग्रा.प. सार्सी ता.नांदगाव खं., जिल्हा अमरावती कडून कोऱ्या निविदा देण्यात येईल. ग्रा.प. सार्सी, ता. नांदगाव खं., जिल्हा अमरावती यांचे अ.जा.न. बौद्ध विकास कार्यक्रम, या योजनेकरिता खालील कामाचे मोहरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग जि.प. अमरावती यांच्या नोंदणी कृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे.

: पहिली वेळ :

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत रूपये | बयाना रक्कम | कोऱ्या निविदेची किंमत | अनामत रक्कम डी.डी. | लेखाशिर्षक | कामाचा कालावधी | पंजीबद्ध कंत्राटदाराचे वर्गीकरण | निविदा विक्री व दाखल करण्याचे दिनांक व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | पेव्हर ब्लॉक बांधकाम करणे | ४,००,०००/- | १% | १०००/- | ४०००/- | अ.जा.व. न. बौद्ध वि. योजना सन २०२५-२६ | ३ महिने | | १९/०१/२०२६ ते २९/०१/२०२६ स. १०.०० ते संध्या. ६.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत | ३०/०१/२०२६ दुपारी १२.०० वा. |

अटी व शर्ती :

१) निविदेच्या अटी व शर्ती ह्या ग्राम पंचायत च्या नोटीस बोर्ड सार्सी येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील तसेच कोणत्याही whatsapp ग्रुप वर पाठविता जाणार नाही.

२) सरपंच/सचिव ग्रामपंचायत च्या सामान्य निधी खाते क्र. ०४६००६६०००००९०३ अम.जि. मध्य. सह. बँक यांच्या नावाने डी.डी. काढण्यात यावा.

३) निविदा हि पंजीबद्ध तांत्रिक व निविदा लिफाफा मध्ये असावेत. तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर सर्व कागद पत्रे असणे आवश्यक आहे. नंतर वेळ दिल्या जाणार नाही. तसेच कामाच्या आदेशावेळी ५०० रु.च्या स्टॅम्प पेररक वर करारनामा देण्यात यावा तसेच सुरक्षा ठेव १% जमा करणे बंधनकारक आहे.

४) निविदा स्वीकारण्याचे तसेच काही कारणात्सव निविदा रद्द करण्याचे अधिकार ग्रा.प. ने राखीव ठेवले आहे.

वरील जाहिरात आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात यावी. हि विनंती

सरपंच / सचिव
ग्रामपंचायत कार्यालय सार्सी
पंचायत समिती नांदगाव खं.
जि. अमरावती

# नांदेडमध्ये साकारणार ५२ एकरांवर 'हिंद-दी-चादर'चा भव्य ऐतिहासिक सोहळा !

## ८ ते १० लाख भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची माहिती




लातूर: शीख धर्माचे नववे गुरु 'हिंद–दी–चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड नगरी एका ऐतिहासिक पर्वाची साक्षीदार होणार आहे. राज्य शासनाच्या वतीने २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. ५२ एकरांच्या विशाल परिसरात गुरुद्वाराची भव्य प्रतिकृती साकारण्यात येत असल्याची माहिती नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज दिली.

**५२ एकरांवर अध्यात्मिक नगरी**

या सोहळ्यासाठी प्रशासनाने ५२ एकर जागेवर भव्य मंडप उभारला आहे. भाविकांच्या सोयीसाठी ८ महालंगर, अत्याधुनिक प्रदर्शन केंद्र (Exhibition Center), साडेतीनशेहून अधिक स्टॉल्स आणि आरोग्य शिबिरे उभारण्यात येत आहेत. भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला आहे.

**दिग्गजांची मांदियाळी**

या सोहळ्यास देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री व संत–महात्मे उपस्थित राहणार आहेत.

**सेवाभावी संस्थांना आवाहन**

देशभरातून सुमारे ८ ते १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याचा अंदाज आहे. या भाविकांच्या सेवेसाठी ज्या स्वयंसेवी संस्थांना (NGOs) सेवा द्यायची आहे किंवा स्टॉल्स लावायचे आहेत, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही कर्डिले यांनी केले आहे. प्रशासनातर्फे त्यांना जागा उपलब्ध करून दिली जाईल. या ऐतिहासिक सोहळ्यात सर्व नांदेडकरांनी आणि भाविकांनी सहकुटुंब सहभागी होऊन या अभूतपूर्व सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# माजी सैनिक, सैनिक पत्नी व पाल्यांसाठी मेस्को सिक्युरिटीमध्ये भरती

मुंबई: माजी सैनिक, वीर नारी तसेच सेवानिवृत्त व सेवेतील जवानांच्या पत्नी आणि अवलंबित पाल्यांसाठी मेस्को सिक्युरिटीकडून सुरक्षा रक्षक पदासाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही भरती कंत्राटी सेवा पद्धतीवर असून, उमेदवारांना त्यांच्या राहत्या घरापासून १० ते १५ किलोमीटर अंतरावर कामाचे ठिकाण देण्यात येणार आहे अशी माहिती मुंबई शहरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

कंत्राटी सेवा पद्धतीवर सुरक्षा रक्षक भरण्यात येणार आहे. या पदासाठी दररोज ८ तास काम, आठवड्यातून १ साप्ताहिक सुट्टी, पीएफ ईएसआय अंतर्गत जीवन विमा सुविधा, बोनस व ग्रॅच्युइटी या सुविधा आहेत. या पदासाठी एक्स सर्व्हिसमन, आर्मी, नेव्ही व एअर फोर्स साठी ३५ ते ५८ वर्षे, सीआरपीएफ, एसआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, होमगार्ड यासाठी ३५ ते ५५ वर्षे वयोमर्यादा, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर नारी : १८ ते ४५ वर्षे, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर पत्नी १८ ते ४५ वर्षे, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर पाल्य ईएसएम पाल्य : २१ ते ३५ वर्षे ही वयोमर्यादा आहे.या पदासाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड,पॅन कार्ड, बँक पासबुक (स्वतःचे व वारसाचे), डिस्र्चाज बुक, पीपीओ, एक्स सर्व्हिसमन आयडी (सेवानिवृत्त जवानांसाठी), मेस्को कोर्स सर्टिफिकेट (वीर नारी, सेवानिवृत्त व सेवेतील जवानांच्या पत्नी व पाल्यांसाठी) मेस्को सिक्युरिटीद्वारे राबविण्यात येणारी ही भरती प्रक्रिया माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षित भविष्याची दिशा देणारी ठरणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन मुंबई शहर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

संपर्कासाठी क्रमांक:– क्षेत्रीय व्यवस्थापक (९९९०३१२३१२), सुरक्षा अधिकारी (७४२०००२८३१) कार्यालयीन दूरध्वनी (९४६६८१९८८७)

# शिवसेना पक्ष आणि चिन्ह सुनावणी : पुन्हा तारीख, २३ जानेवारीला सुनावणी होणार!

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणाला गेली अडीच वर्षे हादरवणारा शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हावरील वाद आता निर्णायक टप्प्यावर येऊन ठेपला आहे. बुधवार २१ जानेवारी या प्रकरणावर सुनावणी होणार होती. मात्र, अरवली पर्वतरांगा प्रकरणामुळे या याचिकेवर सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे आज सर्वोच्च न्यायालयात पुन्हा तारीख मिळाली. आता सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणावर शिवसेनाप्रमुख बाळासाहे ठाकरे यांच्या जयंतीदिनी २३ जानेवारी रोजी अंतिम युक्तिवाद होणार असून, या सुनावणीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. हा संघर्ष केवळ कायदेशीर चौकटीत नसून, तो शिवसेनेच्या अस्तित्वाचा, बाळासाहेब ठाकरे यांच्या राजकीय वारशाचा आणि भविष्यातील सत्तासमीकरणांचा आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण २३ जानेवारी रोजी अंतिम युक्तिवादासाठी येणार आहे. याआधीच न्यायालयाने नोव्हेंबर २०२५ मध्ये हे प्रकरण बराच काळ प्रलंबित असल्याचे नमूद केले होते. जून २०२२ चा राजकीय भूकंप या संपूर्ण वादाची मुळे जून २०२२ मध्ये आहेत. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील ४० आमदारांसह बंड पुकारत भाजपसोबत युती केली. या घडामोडींमुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार कोसळले आणि महाराष्ट्राच्या राजकारणाला नवे वळण मिळाले. शिंदे गटाचा दावा असा होता की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबतची युती शिवसेनेच्या मूळ विचारधारेपासून दूर जाणारी होती. याच असंतोषातून आमदारांनी बंडखोरी केल्याचे सांगण्यात आले.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने विद्यापीठात विविध कार्यक्रमाचे आयोजन

अमरावती : मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शैक्षणिक, वैचारिक आणि साहित्यिक उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथील पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा – २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हा पंधरवडा दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२६ या कालावधीत विविध साहित्यिक व शैक्षणिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. या पंधरवड्यात चर्चासत्र, विद्यार्थ्यांचे कविसंमेलन आणि मुलाखत अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ जानेवारी रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत विद्यार्थ्यांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मोना चिमोटे असतील. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. हेमंत खडके उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावतीचे नितीन भट, माधव पांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांतील विद्यार्थी–कवी आपली कविता सादर करणार आहेत. दि. २७ जानेवारी रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत 'काया वाचा मने' या कादंबरीवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. माधव पुटवाड असतील. तर प्रमुख अतिथी म्हणून साहित्यिक सुनील यावलीकर उपस्थित राहणार असून, प्रा. डॉ. मोना चिमोटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. चर्चेत डॉ . प्रणव कोलते, श्री. दा. गो. काळे, डॉ. भगवान फाळके सहभागी होणार आहेत. पंधरवड्याचा समारोप दि. २८ जानेवारी रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत संशोधक व लेखक डॉ. अशोक मेनकुदळे यांच्या मुलाखतीने होणार आहे.

TRiLOGiC
COMPUTERS & SERVICES
Cell no. : 08928399966, 09764399966

**महाराष्ट्र शासन**

## मेळघाट वन्यजीव विभाग, परतवाडा जामली वन्यजीव परिक्षेत्र

खालील निर्देशीत केलेल्या कामाकरीता बी-1 प्रपत्रातील सिलबंद निविदा मेळघाट वन्यजीव विभाग,परतवाडा अंतर्गत येत असलेल्या जामली (वन्यजीव) विभाग,परतवाडा अंतर्गत येत असलेल्या जामली वन्यजीव यांचे (दुरध्वनी 07223-222643) हे महाराष्ट्र शासनाकडे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडुन निविदा मागवित आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (Civil Cost) | निविदेसोबत भरावयाची रक्कम | कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CONSTRUCTION OF FABRICATED WATCH TOWER AT RAJDEVBABA BEAT KHONGADA ROUND COMP NO. 954 IN JAMLI WL RANGE, MELGHAT WL DIVISION PARATWADA | 822307 | 8223 | 590 | 30 | शासकीय नियमानुसार |

कोऱ्या निविदेचा नमुना वनपरिक्षेत्र अधिकारी जामली (वन्यजीव) परिक्षेत्र यांचेकडुन निर्गमीत करण्याचे ठिकाण,दिनांक,निविदा भरुन सादर करावयाचे ठिकाण व दिनांक इत्यादी तपशिल खालीलप्रमाणे देण्यात आलेला आहे.

1) कोरे निविदा प्रपत्र निर्गमित करणे :- दि. 22/01/2026 ते दि. 28/01/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी 12.00 वाजपर्यंत

2) भरलेल्या निविदा सादर करावयाची अखेरची दिनांक :-दि. 28/01/2026 दुपारी 2.00 वाजपर्यंत

3) निविदा उघडण्याची दिनांक व वेळ :- दि. 29/01/2025 रोजी दुपारी 4.00 वाजता

4) ठिकाण :-वनपरिक्षेत्र कार्यालय जामली (वन्यजीव) परिक्षेत्र

5) तथापी निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी, जामली वन्यजीव परिक्षेत्र यांनी राखुन ठेवला आहे.

6) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी जामली वन्यजीव परिक्षेत्र यांनी राखुन ठेवला आहे. त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकासाठी अंतिम व बंधनकारक राहील.

7) निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती या विभागाचे सुचनाफलकावर दिनांक 22/01/2026 पासुन पहावयास मिळेल.

(स्वाक्षरी / अस्पष्ट)
वन परक्षेत्र अधिकारी
जामली वन्यजीव परिक्षेत्र

गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक – बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती–६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com.
(HARD COPY-B/W, PDF- COLOUR)